# Tip Top 24 NEWS

MH-26-0496625

बुधवार
दि. 23 ऑगस्ट २०२४

बातम्या व जाहिरातीसाठी मो.9529178275 : tiptopnews21@gmail.com


सुप्रीम कोर्टाने 'घड्याळ' बाबत दिला महत्त्वाचा निर्णय!

## ठरलं तर एकादाच 'घड्याळ' कुणाचे ते?



मुंबई : निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीची घोषणा केली असून राज्यात निवडणूक तयारीची रणधुमाळी सुरू आहे. अनेक पक्षांकडून उमेदवार याद्या जाहीर केल्या जात आहेत, या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शरद पवार गटाने विधानसभा निवडणुकीपूर्वी घड्याळ हे निवडणूक चिन्ह गोठवण्याची केलेली मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीतही अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवारांचा घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर खरी राष्ट्रवादी कोणाची यावरून वाद निर्माण झाला होता.केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्ष व पक्षचिन्ह घड्याळ हे चिन्ह अजित पवारांच्या नेतृत्वाखालील गटाला बहाल केले होते.

त्यानंतर शरद पवारांच्या नेतृत्वातील गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत या निर्णयाला आव्हान देण्यात आलं होते. याप्रकरणाचा अंतिम निकाल अद्याप येणं बाकी आहे. त्याआधीच विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाचं घड्याळ चिन्ह गोठवण्यात यावं, अशी मागणी शरद पवारांच्या पक्षाने केली होती. हे प्रकरण सुनावणीसाठी न आल्याने शरद पवारांच्या पक्षाच्या वकिलांनी हे प्रकरण कोर्टासमोर मेन्शन केलं. मात्र यावेळी कोर्टाने घड्याळ चिन्ह गोठवण्यास नकार दिला आहे. घड्याळ म्हणजे शरद पवारांचा पक्ष हे जनतेपर्यंत पोहोचले असून याचा फटका शरद पवारांच्या पक्षाला बसू शकतो, असा दावा करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.

## चिंचवड विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रे निश्चित

चिंचवड- सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये महिला मतदान केंद्र, युथ मतदान केंद्र , अपंग मतदान केंद्र, युनिक मतदान केंद्र, मॉडेल मतदान केंद्र अशी मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली. २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघात विविध प्रकारची मतदान केंद्रे निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडील निवडणूक शाखेमार्फत कळविण्यात आले होते. त्यानुसार चिंचवड मतदार संघामध्ये महिला मतदान केंद्र, युथ मतदान केंद्र , अपंग मतदान केंद्र, युनिक मतदान केंद्र, मॉडेल मतदान केंद्र अशी ५ प्रकारची मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहे. तालेरानगर चिंचवड येथील मतदान केंद्र क्रमांक १४७ पोद्दार इंटरनॅशनल स्कूल येथे महिला मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे. तसेच नवी सांगवी येथील बाबूरावजी घोलप माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय येथील मतदान केंद्र क्रमांक ४११ येथे युथ मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे. तर प्रेमलोक पार्क दळवीनगर येथील महात्मा फुले इंग्लिश मिडियम स्कूल येथील मतदान केंद्र क्रमांक ६६ येथे अपंग मतदान केंद्र उभारण्यात येणार असून पिंपळे सौदागर येथील पी.के. इंटरनॅशनल स्कूल येथील मतदान केंद्र क्रमांक ३५८ येथे युनिक मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे. तर रावेत गाव येथील सिटी प्राईड स्कूल येथील मतदान केंद्र क्रमांक ४४ येथे मॉडेल मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे. २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघात क्रिटीकल मतदान केंद्र, पडदानशिन मतदान केंद्र आणि निगेटिव्ह मतदान केंद्रे नाहीत. तर चिंचवड विधानसभा मतदारसंघाअंतर्गत येणारे सर्व ५६४ मतदान केंद्रांवर वेब कास्टिंग करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली.

**'एक खिडकी' कक्षाची स्थापना**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कामकाजासाठी २०५ चिंचवड मतदारसंघाच्या थेरगाव येथील निवडणूक कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली आहे. या कक्षामार्फत निवडणूक प्रचारासंबंधी वाहन परवाने, प्रचार सभा, कोपरा सभा परवानगी, तात्पुरत्या पक्ष कार्यालयासाठीची परवानगी, रॅली, मिरवणूक, रोड-शो, पदयात्रा यासंबंधीच्या परवानग्या तसेच स्टेज, बॅरीकेटस्, व्यासपीठासाठीच्या परवानग्या आदी संबंधित अर्जांचे विहित नमुने व आवश्यक कागदपत्रे याबाबतची माहिती उमेदवारांना पुरविण्यात येणार आहे.एक खिडकी कक्षातील सुविधांचा लाभ घेण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग क्षेत्रीय कार्यालय, तळ मजला, थेरगाव याठिकाणी संपर्क साधावा, असेही अनिल पवार यांनी सांगितले आहे.



## हक्काचा माणूस विधानसभेवर पाठवण्याचा पिंपळे गुरवकवासीयांचा निर्धार

पिंपळे गुरव : - गेली कित्येक वर्षे स्व. लक्ष्मणभाऊ असतील, अश्विनीताई असतील किंवा आता शंकरभाऊ असतील हे सक्रिय राजकारणात असूनही त्यांनी कधीही सत्ता डोक्यात जाऊ दिली नाही. आपल्या पिंपळे गुरव परिसराचा आमूलाग्र कायापालट करणारे आणि नागरिकांच्या अडीअडचणीला धावून येणाऱ्या शंकर जगताप यांना यावेळी संधी मिळाली आहे. आणि या संधीचे पुन्हा एकदा सोने करून आमच्या या हक्काच्या माणसाला विधानसभेत पाठविण्यासाठी आम्ही जीवाचे रान करू, असा निर्धार पिंपळे गुरवमधील सर्व ग्रामस्थांनी केला आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज (रविवारी) भारतीय जनता पक्षाच्या वतीने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. या पहिल्याच यादीत चिंचवड विधानसभा मतदारसंघातुन शंकर जगताप यांचे नाव जाहीर करण्यात आले. जगताप यांचे नाव जाहीर झाल्याचे समजताच पिंपळे गुरवमधील सर्व ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने एकत्र येऊन बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत गावातील स्थानिक जगताप, कदम, देवकर, काशीद, जवळकर, नवले, गांगर्डे, कवडे, जांभुळकर, भालेकर, डोळस, शिंदे, लोखंडे, आदियाल कुटुंबातील ज्येष्ठ ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला वर्ग, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण त्याचबरोबर व्यापारी आणि विविध सामाजिक मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीला गावातील ज्येष्ठ मंडळींनी मार्गदर्शन केले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये कामगार न्यायालयासाठी पाठपुरावा करणार!



पिंपरी : पिंपरी-चिंचवड ही कामगार नगरी आहे. शहरातील लघु व मध्यम उद्योगांमध्ये तसेच विविध कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना, युनियमच्या प्रतिनिधींना कामगार - व्यवस्थापन वादाबाबत पुणे-मुंबईत जावे लागते. मोशी येथे पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुल उभारणीची पायाभरणी झाली आहे. आगामी काळात शहरात कामगार न्यायालय निर्माण व्हावे. यासाठी सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहे, असा संकल्प आमदार महेश लांडगे यांनी केला.

महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी कामगारांच्या वतीने कृतज्ञता संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्वाभिमानी कामगार संघटना, महिंद्रा अँड महिंद्रा वेहिकल्स, लॉजिस्टिक, हेवी इंजिनचे सभासद या संमेलनामध्ये सहभागी झाले होते.संमेलनामध्ये आमदार महेश लांडगे, माजी महापौर राहुल जाधव, स्वाभिमानी कामगार संघटनेचे नेते रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन यळवंडे, टाटा मोटर्स कार प्लांटचे योगेश तळेकर तसेच महिंद्रा कंपनीचे कर्मचारी प्रदीप तळेकर, राहुल तळेकर, पंकज लांडगे, अजय घाडगे, शुभम बवले, सचिन वहिले, सुरज लांडगे, आकाश गव्हाणे, गणेश भुजबळ, सचिन धापटे, सुयोग भालेकर, संतोष भुजबळ, आदी उपस्थित होते.